MHYA130003112025

# निशाणी क्र. २६ खालील आदेश

प्रस्तूतचा अर्ज अर्जदार हिने गैरअर्जदाराच्या वेतनातून दरमहा खावटी वसुली रक्कम रुपये २०,०००/- दरमहा कपात करुन मिळणे बाबत दाखल केलेला आहे.

२. सदरील अर्जास गैरअर्जदार यांनी आक्षेप नोंदविला आहे की, वि. न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या पगारपत्रानुसार गैरअर्जदारास ह्या व्यतिरिक्त पण पगारातून होमलोन इत्यादीच्या कपाती आहेत. त्यामुळे गैरअर्जदारातर्फे अर्जदारास खावटीची रक्कम भरण्यास टाळाटाळ होत नाही आहे. ह्या आधीपण गैरअर्जदाराने खावटीची रक्कम विद्यमान न्यायालयात भरलेली आहे. तसेच त्यामुळे गैरअर्जदाराचा टाळाटाळ करण्याचा हेतू नसून गैरर्जदाराने मुलीच्या शाळेची फी तसेच कपडे-लत्त्याचा खर्च स्वतः केलेला आहे. तसेच योग्य तो आदेश पारीत करण्याची विनंती गैरअर्जदार यांनी केली आहे.

३. प्रस्तूतचा अर्ज व मुळ अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदार व गैरअर्जदार यांच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदाराच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, वि. न्यायालयाने गैरअर्जदार यांच्या विरुध्द खावटीच्या केसमध्ये २०,०००/- रु. खावटी अर्जदार यांना देण्याचा आदेश पारीत केला आहे. गैरअर्जदार हा जाणुन-बुजून खावटीचे पैसे भरण्यास दुर्लक्ष करुन खावटीची रक्कम भरण्यास टाळाटाळ करीत आहे. गैरअर्जदाराच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, गैरअर्जदाराने खावटीची काही रक्कम भरली आहे. गैरअर्जदार खावटीची रक्कम भरण्यास टाळाटाळ करत नाही. तसेच त्याच्या पगारातून होम लोन देखील कपात होते. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे आज रोजी गैरअर्जदाराकडे तिची एकूण रक्कम ४,००,०००/- रुपये थकित खावटी वसूल करणे बाकी आहे. तसेच त्याबाबतचे प्रथमदर्शी दस्त ऐवज अभिलेखावर उपलब्ध आहे. त्यामुळे आज रोजी अर्जदारांची गैरअर्जदारांकडे दि. २३/०६/२०२३ ते दि. २३/०२/२०२५ या कालावधीची रक्कम ४,००,०००/- रुपये व अर्जाचा खर्च ५,०००/- रुपये अशी एकुण ४,०५,०००/- रुपये थकीत खावटी वसूली करणे बाकी असल्याचे स्पष्ट होते. म्हणजेचं सदर गैरअर्जदाराने म.सं.कौ.हिं.का. अर्ज क्र. ५३/२०२३ मधील आदेशाची पुर्तता केलेली नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे अर्जदार हे थकित खावटी गैरअर्जदाराकडून वसुल करण्यास हक्कदार आहे.

५. प्रस्तूत अर्जाच्या अनुषंगाने वेतन कपातीचा विचार केला असता, गैरअर्जदार हा पोलीस स्टेशन अमरावती, ता. जि. अमरावती येथे पोलिस शिपाई या पदावर कार्यरत असल्याबाबत, प्रथमदर्शी पुरावा अभिलेखावर आहे. गैरअर्जदार याचे असे म्हणणे आहे की, त्याच्या पगारातून होम लोन कपात होते. परंतू त्या संदर्भात गैरअर्जदाराने कोणतेही कागदपत्र अभिलेखावर दाखल केले नाही. तसेच नि. क्र. २४ वरील गैरअर्जदाराच्या माहे-डिसेंबर २०२५ ते माहे-फेब्रुवारी २०२६ च्या वेतन प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता, त्यास दरमहा ३५,०३३/- निव्वळ वेतन मिळत असल्याचे प्रथमदर्शी दिसुन येते. त्यामुळे गैरअर्जदार हा अर्जदाराची थकित खावटी रक्कम भरण्यास आर्थिक दृष्ट्या सक्षम असल्याचे दिसुन येते. तरी देखील गैरअर्जदाराने उपरोक्त नमुद म. सं. कौ. हिं. का. अर्ज क्र. ५३/२०२३ मधील आदेशाची पुर्तता अंमलबजावणी केलेली नाही. त्यामुळे गैरअर्जदाराच्या वेतनातून दरमहा खावटी वसूल करणे आवश्यक आहे. त्यामुळे खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेः-

## <u>आदेश</u>

१. प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. पोलिस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर, ता. जि. अमरावती यांना आदेशित करण्यात येते कि, त्यांनी गैरअर्जदार पोलिस शिपाई नामे- गोपाल नारायणराव जोंधळे, पोलीस शिपाई क्र. ५६९ यांच्याकडे उपरोक्त नमूद कालावधीतील थकित असलेल्या एकूण ४,०५,०००/- रुपये खावटी रक्कम वसुली पर्यंत त्याच्या दरमहा वेतनातून २०,०००/- रुपये प्रमाणे रक्कम कपात करुन, सदर कपात केलेली रक्कम या न्यायालयातील फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ४५/२०२५ या प्रकरणात जमा करावी.

३. सदरील आदेशाच्या पुर्ततेकामी संबंधीत विभागास पत्र व्यवहार करावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by BALAVIR NARAYAN GODBOLE
Date: 2026.05.02 16:32:11 +0530

दिनांक. ०२/०५/२०२६

( बी. एन. गोडबोले)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायलय क्र. १ दिग्रस